# महावितरण विद्युत वार्ता

वर्ष ११ वे : अंक ०३ • सप्टेंबर २०१५




## !! हितगुज !!

"गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळांना तात्पुरती वीज जोडणीसाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून कागदपत्रांची व आवश्यक रक्कमेचा भरणा केल्यानंतर मंडळाच्या आवश्यकतेनुसार वीजपुरवठा करण्यात येईल. यासाठी कमी दराने वीज उपलब्ध करून देण्यात येत आहे."

"उत्सव मंडळांनी वीज अपघात टाळण्यासाठी अधिकृतच वीज जोडणी घ्यावी. त्यासाठी कर्मचाऱ्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. तसेच अनधिकृत वीज जोडणी दिसून आल्यास त्या विरोधात कठोर कारवाई करावी."

महाराष्ट्र हे विविध संस्कृती व परंपरेने नटलेले राज्य आहे. आपल्या राज्यात गणेश उत्सव, नवरात्र, दिवाळी इत्यादी उत्सव मोठ्या आनंद व उत्साहाने साजरे केले जातात. हे सर्व सण, उत्सव श्रध्दापूर्वक साजरे होत असल्यामुळे आपल्या रोजच्या धकाधकीच्या जीवनातही बदल घडून येत असतो. तसेच त्यामुळे मनालाही शांती व उल्हास मिळून आपण सर्वजण प्रफुल्लीत होत असतो. यासर्व गोष्टींमुळे आपल्यामध्ये नवीन चैतन्य निर्माण होऊन त्याचा आपल्या कामावर सकारात्मक परिणाम होत असतो. त्यामुळेच अशा या आनंद उत्सोहात श्रीमंत-गरीब, जात-पात असा भेदभाव न होता सर्वजण मोठ्या आनंदाने यात सहभागी होत असतात. असे हे उत्साहाचे दिवस पुढील दोन-तीन महिने आपल्याकडे आता राहणार आहेत.

विशेषत: आता गणेशउत्सव व नवरात्र उत्सवांची तयारी सुरू झालेली आहे. हे उत्सव साजरे करण्यासाठी गणेश व नवरात्र उत्सव मंडळांतर्फे मोठ-मोठे मंडप उभारून हे उत्सव साजरे होत असतात. या मंडपांना सजविण्यासाठी रंगीबेरंगी दिव्यांची मोठी तोरणे लावण्यात येतात. सर्वत्र प्रकाशाचा झगमगाट असतो. यासाठी मोठ्याप्रमाणात विजेचा वापर केला जातो. सामाजिक बांधीलकीचे नाते जपणाऱ्या महावितरणने अशा धार्मिक उत्सवांकरिता अतिशय कमी दरात वीजपुरवठा देण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे.

गणेशउत्सव व नवरात्रोत्सव मंडळांना तात्पुरता वीजपुरवठा घेण्याकरिता महावितरणने "ऑनलाईन" सुविधा उपलब्ध करून दिली असून त्यासाठी महावितरणाच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर नवीन वीज जोडणीकरिता अर्ज करावा लागेल. नवीन जोडणी घेण्याकरिता आवश्यक असणारा अर्ज म्हणजे ए-१ प्रपत्र, स्थानिक सक्षम अधिकारी किंवा पोलीस अधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र आणि वीज जोडणीचा चाचणी अहवाल (टेस्ट रिपोर्ट) ही सर्व कागदपत्रे अपलोड करून महावितरणकडे सादर करावयाची आहेत.

धार्मिक उत्सव साजरे करणाऱ्या मंडळांना सहजपणे परवडतील असेच वीजदर आकारण्यात येणार आहेत. लघुदाब किंवा उच्चदाब वीजभार घेणाऱ्या उत्सव मंडळांना प्रतिजोडणी प्रतिमहिना २९० रूपये स्थिर आकार तर प्रतियुनिट ३.७१ पैसे याप्रमाणे वीजदर आकारण्यात येतील. या धार्मिक उत्सव मंडळांना सदर कालावधीकरिता एक हजार रूपये प्रतिकेडब्ल्यू सुरक्षा अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. उत्सव मंडळांनी कागदपत्रांची पूर्तता व आवश्यक रकमेचा भरणा केल्यानंतर तीन दिवसांत वीजपुरवठा मंजूर करून त्यांच्या आवश्यकतेनुसार वीज जोडणी देण्यात येईल. त्यामुळे जास्तीत जास्त उत्सव मंडळांनी कमी दराने उपलब्ध असलेल्या विजेचा वापर करावा, यासाठी सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी काटेकोर प्रयत्न करावेत.

उत्सव मंडळातर्फे होणारे कार्यक्रम व देखावे बघण्यास लोकांची प्रचंड गर्दी उसळत असते. त्यामुळे वीजसुरक्षा आपल्यासाठी व लोकांसाठीही फार महत्वाची बाब आहे. याकरिता उत्सव मंडळांनी अधिकृतरित्या वीजपुरवठा घ्यावा, अनधिकृत वीजपुरवठ्याच्या मोहात पडू नये. कारण अनधिकृतपणे विजेचा वापर केल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनधिकृत वीजवापर करणाऱ्या उत्सव मंडळांना दामिनी पथकाच्या माध्यमातून वीज अपघात व वीजचोरीच्या परिणामांची जाणीव करून देऊन त्यांना नियमानुसार वीजपुरवठा घेण्यासाठी आग्रहाची विनंती आपण सर्वांनी करावी. एखाद्या ठिकाणी विजेचा गैरवापर होत असल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करावी तसेच सुरक्षेच्या दृष्टीने तेथील वीजपुरवठा त्वरित बंद करावा. वीजचोरी हा गुन्हा असल्यामुळे नियमानुसार वीजपुरवठा घ्यावा, असे आवाहन कर्मचाऱ्यांनी उत्सव संस्थांना करावे. अशा या सार्वजनिक उत्सवांमुळे कर्मचाऱ्यांवर थोडा कामाचा बोजा वाढेल, याची मला जाणीव आहे पण आपली सामाजिक जबाबदारी समजून याही काळात चांगली सेवा देण्यासाठी आपण सदैव तत्पर राहावे.

मागील तीन-चार वर्षांपासून सर्वच प्रकारच्या धार्मिक उत्सवांना अखंडित वीजपुरवठा मिळेल यासाठी आपण सतत प्रयत्नशील आहोत. यावर्षी झालेल्या कमी पावसामुळे राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्याचे दिसून येत आहे. धार्मिक उत्सव साजरा करतांना विजेचा अनावश्यक वापर टाळून जास्तीत जास्त विजेची बचत, वीज सुरक्षितता याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. आपण हे कराल, याची मला खात्री आहे.

**ओम प्रकाश गुप्ता**
व्यवस्थापकीय संचालक

आपणा सर्वांना धार्मिक सणासाठी हार्दीक शुभेच्छा!

## चिरोली ३३ कि.व्हो. उपकेंद्र कार्यान्वित



उपकेंद्राच्या उद्घाटन प्रसंगी मुख्य अभियंता श्री. प्रसाद रेशमे व इतर.

चंद्रपूर विभागातील मूल उपविभाग अंतर्गत चिरोली ३३ कि.व्हो. उपकेंद्राचे उद्घाटन नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. प्रसाद रेशमे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या उपकेंद्रामुळे परिसरातील नागरिकांना अखंडित व योग्य दाबाची वीज मिळणार आहे.

या उपकेंद्राच्या उद्घाटन प्रसंगी चंद्रपूर मंडलाचे अधीक्षक अभियंता सर्व श्री. हरिष गजबे, अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) श्री. यु.बी. शहारे, अधीक्षक अभियंता (नागपूर चाचणी मंडल) श्री. एम.डी. लांडे, कार्यकारी अभियंता श्रीमती. अर्चना घोडेस्वार, कार्यकारी अभियंते सर्वश्री अजय खोब्रागडे, के.एस. रामटेके, डब्ल्यू.जी. नगराळे, एन.जी. चोपडे प्रामुख्याने उपस्थित होते.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त नाशिक येथे रक्तदान शिबिर



नाशिक येथे रक्तदान शिबिरप्रसंगी उपस्थित मुख्य अभियंता श्री. सुहास रंगारी व इतर.

नाशिक येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त तसेच थोर शास्त्रज्ञ व माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना श्रद्धांजली म्हणून नाशिक परिमंडलाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात २७ अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

नाशिक परिमंडलाने सामाजिक बांधिलकी म्हणून या उपक्रमाचे आयोजन केले होते. सकाळी ध्वजवंदनाच्या कार्यक्रमानंतर नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुहास रंगारी यांच्याहस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्य अभियंता श्री. प्रशांत नेवासकर (मुख्यालय), अधीक्षक अभियंता सौ. रंजना पगारे (मुख्यालय), अधीक्षक अभियंते सर्वश्री. गोपाळ पानकर, एन. एस. इरवाडकर, महाव्यवस्थापक (विवले) श्री. प्रकाश अहिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास उपमहाव्यवस्थापक(मातं) सौ. कांचन राजवाडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्री. प्रविण बागुल आदींसह अभियंते, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## तांत्रिक कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधन सामुग्रीचे वाटप



तांत्रिक कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधन सामुग्रीचे वाटप करताना
मुख्य अभियंता श्री. सतिश चव्हाण व सोबत इतर.

महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधन सामुग्रीचे वाटप औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सतिश चव्हाण यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

या प्रसंगी मुख्य अभियंता श्री. सतिश चव्हाण, शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. प्रभाकर निर्मळे व ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. अशोक फुलकर यांनी विजेची कामे करताना अपघात होऊ नये याबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यकारी अभियंता श्री. सुनिल काकडे यांनी केले.

या कार्यक्रमास कार्यकारी अभियंते सर्वश्री मदन शेवाळे, नामदेव गांधीले, अनिलकुमार नितनवरे, देवेंद्र जायस्वाल, प्रभारी उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. सिद्धार्थ सुर्यवंशी, अतिरिक्त उपकार्यकारी अभियंते, सहाय्यक अभियंते, शाखा अभियंते, अधिकारी, जनमित्र, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## बारामती परिमंडलात मेडिक्लेमवर कार्यशाळा




कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्री.पंकज परदेशी. सोबत मुख्य अभियंता श्री.रामराव मुंडे,
अधीक्षक अभियंता श्री.केशव सदाकळे व इतर.

ग्रुप मेडिक्लेम विमा पॉलिसीची संपूर्ण माहिती व्हावी आणि सर्व कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता यावा यासाठी बारामती परिमंडल कार्यालयाच्या वतीने नुकतीच कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यशाळेस मुख्य अभियंता श्री.रामराव मुंडे, अधीक्षक अभियंता श्री.केशव सदाकळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री.वामनराव जाधव, कार्यकारी अभियंते सर्वश्री विजयकुमार भट्टड, भाऊसाहेब इवरे, वरिष्ठ व्यवस्थापक (वि.व.ले) श्री.विनोद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.श्रीकृष्ण वायदंडे यांनी केले. मुख्य लिपीक श्री.रामचंद्र साळगावकर यांनी सूत्रसंचालन केले. उपव्यवस्थापक (मा.सं.) श्री. रामकृष्ण वाघमोडे यांनी आभार मानले.

## एका वर्षात २ लाख शेतकऱ्यांना कृषीपंपाची जोडणी ऊर्जामंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे



कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ना.श्री. चंद्रशेखर बावनकुळे व उपस्थित मान्यवर.

विदर्भ, मराठवाड्यातील २ लाख शेतकऱ्यांना एका वर्षात कृषीपंपाची जोडणी दिल्या जाईल, याकरिता एक हजार कोटींची तरतूद करण्यात आली असून त्यापैकी नागपूर जिल्ह्यासाठी ४६ कोटी रुपयांची तरतूद केली असल्याची माहिती ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जामंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. पायाभूत आराखडा टप्पा - २ अंतर्गत हुडकेश्वर (खुर्द) येथील ३३/११ कि.व्हो. उपकेंद्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागपूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती निशाताई सावरकर होत्या. नागपूर शहर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. मोहन झोडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. प्रसाद रेशमे उपस्थित होते.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्या श्रीमती. शुभांगी गायधने, पंचायत समिती सदस्य श्री.अजय बोढारे, सदस्या श्रीमती मंजुषा भांबुलकर, हुडकेश्वर (खुर्द) च्या सरपंच श्रीमती वर्षा बारसागडे आणि उपसरपंच श्री. कमलाकर शेंडे, आभार प्रदर्शन कार्यकारी अभियंता श्री. सुहास मैत्रे यांनी केले.

## विदर्भासाठी दोन नवीन परिमंडल ऊर्जामंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा



प्रशासकीय ईमारतीचे उद्घाटन करताना ऊर्जामंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे सोबत आ. श्री. सुधाकरराव देशमुख, संचालक श्री. आर. पी. गोयंका व इतर.

महावितरणच्या नागपूर ग्रामिण परिमंडलाचे विभाजन करुन चंद्रपूर आणि गोंदिया त्याचप्रमाणे अकोला परिमंडलाचे विभाजन करुन अकोला आणि अमरावती परिमंडल स्थापन करण्याची घोषणा राज्याचे ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. नागपूर शहर परिमंडल कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय ईमारतीचे उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ना. श्री. बावनकुळे बोलत होते. येत्या महिन्याभरात नवनिर्मित परिमंडल कार्यालये सुरु होतील असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात महापौर श्री. प्रवीण दटके व आमदार श्री. सुधाकरराव देशमुख यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक नागपूर शहर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. मोहन झोडे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मधुसुदन मराठे यांनी संचालन केले तर आभार प्रदर्शन कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत सराफ यांनी केले. यावेळी मराविमं सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. आर.पी. गोयंका, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. प्रसाद रेशमे आदी उपस्थित होते.

## अमरावती परिमंडलामध्ये 'ग्राहक संपर्क अभियान'

अमरावती परिमंडलातील पाचही जिल्हयांमध्ये गेल्या महिन्यात तालुकानिहाय ग्राहक संपर्क अभियान राबविण्यात आले. या माध्यमातून ग्राहकांशी थेट संवादाच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न, तक्रारी व समस्या जाणून घेऊन शक्यतोवर त्या तक्रारी - समस्या तेथेच सोडविण्यात आल्या. याशिवाय या अभियानात महावितरणच्या योजनांची माहिती व सद्यस्थिती सुध्दा ग्राहकांना देण्यात आली.



ग्राहक संपर्क अभियानात ग्राहकांशी थेट संवाद साधताना मुख्य अभियंता श्री संजय ताकसांडे

अभियानातंर्गत अकोला मंडलातील अकोट उपविभागामध्ये झालेल्या कार्यक्रमात मुख्य अभियंता श्री संजय ताकसांडे यांनी स्वत: ग्राहकांशी थेट संवाद साधून त्यांच्या तक्रारी व प्रश्न ऐकून घेऊन त्यांना योग्य उत्तरे दिली तसेच तक्रारींचे स्वरुप लक्षात घेऊन तक्रारींचे तात्काळ निवारणही केले. अभियानात महावितरणकडून तालुक्यातील प्रस्तावित कामे व सद्यस्थिती, कृषिपंप ज्येष्ठता यादी, विविध योजना, अपघातासंदर्भात जागृती, धडक सिंचन योजना व महावितरणसंबंधी इतरही माहिती ग्राहकांना देण्यात आली. याशिवाय ग्राहकांकडून आलेल्या तक्रारी व समस्यांचे निराकरण करण्यासाठी कृती आराखडासुध्दा तयार करण्यात आला आहे.

अमरावती परिमंडलातील काही भागांमध्ये ग्राहकसेवेसंदर्भात काही अप्रिय व दुर्दैवी घटना घडल्या होत्या. त्यामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. त्यामुळे मुख्य अभियंता श्री संजय ताकसांडे यांच्या संकल्पनेतून वरिष्ठ अधिकाऱ्यांचा थेट ग्राहकांशी संवाद व ग्राहकांना वस्तुस्थिती समजावून सांगण्याकरीता अभियानाची दिशा ठरली. या अभियानात संपर्क शिबिरांमध्ये मंडलाचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, शाखा अभियंता व जनमित्र सहभागी झाले होते.

या अभियानाचा महत्वपूर्ण उद्देश म्हणजे ग्राहक वा शेतकरी बांधवांना वरिष्ठ अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधता आला. त्यामुळे त्यांचे गैरसमज दूर होण्यास मदत झाली. अभियानाला ग्राहकांचाही उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. तसेच महावितरणच्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत करण्यात आले.

हार्दिक अभिनंदन

# दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी

हार्दिक अभिनंदन



**कु. गौतमी अवसरे.**
विभाग - मुंबई.
गुण - ९६.६० टक्के.
पालक - श्री. राजेंद्र पुरुषोत्तम अवसरे, उच्चस्तर लिपीक, उपविभाग १, उल्हासनगर



**चि. अक्षय मालुंजकर.**
विभाग - मुंबई.
गुण - ९६.४० टक्के.
पालक - श्री. साहेबराव मालुंजकर, कारागिर 'क', कल्याण चाचणी विभाग १.



**कु. मिताली पिल्लेवान.**
विभाग - नागपूर.
गुण - ९६.४० टक्के.
पालक - श्री. महेंद्र पिल्लेवान, कारागिर 'ब', ग्रामीण चाचणी विभाग, नागपूर शहर परिमंडल.



**चि. आकाश गणेश वाघ.**
विभाग - मुंबई.
गुण -९६.२० टक्के.
पालक - श्री. गणेश दत्तात्रय वाघ, वाहिनी निरिक्षक, गाळणी विभाग, पालघर विभाग.



**कु. सिध्दी नलवडे.**
विभाग - कोल्हापूर.
गुण - ९६.०० टक्के.
पालक - श्री. हणमंत बाळकृष्ण नलवडे, टंकलेखक, गारगोटी उपविभाग ग्रामिण २ कोल्हापूर).



**चि. शुभम पांचाळ.**
विभाग - लातूर.
गुण - ९५.८० टक्के.
पालक - श्री. संभाजी पांचाळ, क. यंत्रचालक, ३३/११ कि.व्हो. उपकेंद्र गंगापूर, लातूर (ग्रा)



**कु. हर्षाली विजय पाटील**
विभाग - नाशिक विभाग.
गुण - ९५.४० टक्के.
पालक - श्री. विजय पाटील, प्रणाली विश्लेषक, धुळे.



**कु. कल्याणी कुलकर्णी**
विभाग - मुंबई.
गुण - ९५.०० टक्के
पालक- श्री. ज्ञानेश कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, वाणिज्य विभाग,मुख्यालय, मुंबई.



**चि. अनिकेत वाघमारे.**
विभाग - नागपूर.
गुण - ९५.०० टक्के.
पालक - श्री. सम्राट वाघमारे, अधीक्षक अभियंता, नागपूर



**चि. नितेश राजू कांबळे.**
विभाग - अमरावती.
गुण - ९४.६० टक्के.
पालक - श्री. राजू मारोतराव कांबळे, उपयंत्रसंचालक, ३३ के.व्ही. उपकेंद्र, लोणी, वरुड - २ उपविभाग,



**कु. पुनम प्रमोद खुळे.**
विभाग - अमरावती.
गुण - ९४.२० टक्के
पालक - श्री. प्रमोद खुळे, उपमहाव्यवस्थापक, माहिती तंत्रज्ञान, नागपूर परिमंडल.



**कु. अनघा महाजन.**
विभाग - नागपूर.
गुण - ९३.०० टक्के.
पालक - श्री. राकेश न. महाजन, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, आर्वी विभाग.



**मृणाल सुनील पावडे.**
विभाग - पुणे.
गुण - ९२.४० टक्के.
पालक - श्री. सुनील पावडे, कार्यकारी अभियंता, सासवड विभाग.



**चि. निलेश संजय पाटील.**
विभाग - पुणे.
गुण - ९२.०० टक्के.
पालक - श्री. संजय मिठाराम पाटील, सहाय्यक यंत्रचालक, बेलापूर उपकेंद्र, श्रीरामपूर उपविभाग,



**चि. आदित्य मुंदाने.**
विभाग - अमरावती.
गुण - ९१.८० टक्के.
पालक - श्री. गोपाल उमाजी मुंदाने, उपयंत्रचालक, ३३ कि.व्हो. उपकेंद्र, वसंतनगर, दिग्रस उपविभाग,



**कु. श्रावस्ती रामटेके.**
विभाग - औरंगाबाद.
गुण - ९१.६० टक्के.
पालक - श्री. नरेंद्र ललित रामटेके, विजतंत्री कारागीर-ब, स्थापत्य उपविभाग बीड,



**चि. लक्ष्मण विष्णु अंबोरे.**
विभाग - अमरावती.
गुण - ९१.४०टक्के.
पालक - श्री. विष्णु नामदेवराव अंबोरे, उपव्यवस्थापक (वि.व.ले.), विभागीय कार्यालय पुसद,



**चि. अखिलेश दांडगे.**
विभाग - औरंगाबाद.
गुण - ९१.४० टक्के.
पालक - श्री. प्रवीण नारायण दांडगे, कार्यकारी अभियंता, परभणी चाचणी विभाग.



**कु. सायली राजेश काळे.**
विभाग - पुणे.
गुण - ९०.८० टक्के.
पालक - श्री. राजेश काळे, उपकार्यकारी अभियंता, सासवड विभाग.



**कु. तृप्ती मिलींद पाटील.**
विभाग - कोल्हापूर.
गुण - ९०.८० टक्के.
पालक - श्री. मिलिंद निवृत्ती पाटी, निम्नस्तर लिपीक वडगांव उपविभाग, जयसिंगपूर विभाग,



**चि. अथर्व येडलावार.**
विभाग - अमरावती.
गुण - ९०.६० टक्के
पालक- श्री. हेमंत दत्तात्रेय येडलावार, आधारसामग्री पर्यवेक्षक, माहिती तंत्रज्ञान विभाग, नागपूर परिमंडल.



**चि. महेश लहू विरळेकर.**
विभाग - कोल्हापूर.
गुण - ९०.४० टक्के.
पालक - श्री. लहू राजाराम विरळेकर, उच्चस्तर लिपीक (मा.स.), ग्रामिण विभाग - २, कोल्हापूर.



**कु. आभा कुंदन भिसे.**
विभाग - दिल्ली.
गुण - ९.८ ग्रेड पॉईंट.
पालक - श्री. कुंदन भिसे, कार्यकारी अभियंता, नागपूर शहर परिमंडल.



**कु. वैदेही विनोद पाटील.**
विभाग - मुंबई.
गुण -८९.८० टक्के.
पालक - श्री. विनोद नारायण पाटील, सहाय्यक लेखापाल, अर्थोपाय विभाग, मुख्यालय, मुंबई.



**कु. ऐश्वर्या माळगे.**
विभाग - लातूर.
गुण - ८९.८० टक्के.
पालक - श्री. हावगीस्वामी माळगे, उच्चस्तर लिपीक, देगलूर विभागीय कार्यालय.



**चि. भुषण खंडारे.**
विभाग - अमरावती.
गुण - ८९.६० टक्के.
पालक - श्री. पी.टी. खंडारे, सहाय्यक यंत्रचालक, ३३/११ कि.व्हो. उपकेंद्र, निंबारी, दर्यापूर उपविभाग,



**चि. हर्ष कुटे.**
विभाग - नागपूर
गुण -८९.४० टक्के.
पालक - श्री. नरेश पुंडलिकराव कुटे, कनिष्ठ लिपीक, देवळी उपविभाग, नागपूर परिमंडल.



**कु.अनविक्षा कमाले.**
विभाग - नागपूर.
गुण - ८८.४० टक्के.
पालक - श्री. सुरेश झिबल कमाले, तंत्रज्ञ कोराडी महादूला वीज केंद्र, खापरखेडा उपविभाग,



**कु. प्रणोती होणराव.**
विभाग - पुणे.
गुण - ८८.४० टक्के.
पालक - श्री. सोमेश्वर होणराव, उपयंत्रचालक, ३३ कि.व्हो. उपकेंद्र, जामगाव, बार्शी विभाग.



**चि. श्रेयश लामकाने.**
विभाग - कोल्हापूर.
गुण - ८७.८० टक्के.
पालक - श्री. अशोक निवृत्ती लामकाने, कारागीर 'ब' मीटरवाचक, उपकेंद्र, सासकल, फलटण विभाग,



**कु. स्नेहल घाटेराव.**
विभाग - पुणे.
गुण - ८७.८०टक्के.
पालक - श्री. दिलीप बंडोपंत घाटेराव, मुख्य तंत्रज्ञ, परंडा उपविभाग, उस्मानाबाद



**चि. निशांत महेश देशमुख.**
विभाग - केडगाव.
गुण - ८७.६७ टक्के.
पालक - श्री. महेश विजय देशमुख, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, केडगाव विभाग.



**कु. पानेरी ए. सहारे.**
विभाग - नागपूर विभाग.
गुण - ८६.०० टक्के.
पालक - श्री. ए.डी. सहारे, कार्यकारी अभियंता (प्रशासन), नागपूर परिमंडल, नागपूर



**कु. हर्षदा अशोक साळुंके.**
विभाग - पुणे.
गुण - ८५.८० टक्के.
पालक - श्री. अशोक हरिशचंद्र साळुंखे, सहाय्यक लेखापाल, राहुरी उपविभाग, श्रीरामपूर विभाग,



**चि. चिंणमय ठाकरे.**
विभाग - अमरावती.
गुण - ८५.६०टक्के.
पालक - श्री. अरुण रामभाऊजी ठाकरे, कनिष्ठ यंत्रचालक, आसेगाव पूर्णा. उपकेंद्र,

# विविध परिमंडलात बेरोजगार विद्युत अभियंत्यांच्या मेळाव्यास मोठा प्रतिसाद

महावितरणच्या उच्चदाब व लघुदाब वाहिन्यांच्या देखभाल दुरूस्तीची कामे बेरोजगार अभियंत्यांना देण्याचे धोरण शासनाने निश्चित केले आहे. त्यासाठी विविध परिमंडलात आयोजित बेरोजगार विद्युत अभियंत्यांच्या मेळाव्यास मोठा प्रतिसाद मिळाला.

**पुणे परिमंडल:-** पुणे परिमंडलाने आयोजित केलेल्या बेरोजगार विद्युत अभियंत्यांच्या परिमंडलस्तरीय मेळाव्यास मोठा प्रतिसाद मिळाला. रास्तापेठ येथील




पुणे परिमंडलातील मेळाव्यास मार्गदर्शन करताना प्रभारी मुख्य अभियंता श्री. भालचंद्र खंडाईत व इतर.

महावितरणच्या प्रशासकीय इमारतीत हा मेळावा झाला. प्रभारी मुख्य अभियंता श्री. भालचंद्र खंडाईत यांनी या दोन्ही योजनांची सादरीकरणातून सविस्तर माहिती दिली. यावेळी अधीक्षक अभियंता श्री. शिवाजी चाफेकरांडे व श्री. अंकुश नाळे यांची उपस्थिती होती.

महावितरणमधील या दोन्ही योजनांचा बेरोजगार विद्युत अभियंत्यांनी लाभ घ्यावा व पुढील कार्यवाहीसाठी संबंधीत विभागीय कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी मुख्य अभियंता श्री. भालचंद्र खंडाईत यांनी केले.यावेळी उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. रामगोपाल अहिर, कार्यकारी अभियंता श्री. प्रकाश जमदाडे, श्री. हरिश्चंद्र बिरनवार, श्री. अमसिद्ध हुवाळे आदींची उपस्थिती होती.

**नांदेड परिमंडल :-** नांदेड परिमंडल कार्यालयात बेरोजगार विद्युत अभियंत्यांसह




मेळाव्याप्रसंगी उपस्थित मुख्य अभियंता श्री. आर.जी.शेख व इतर.

सेवानिवृत्त विद्युत अभियंत्याचा मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला. मेळाव्यास बेरोजगार अभियंत्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता श्री. आर.जी.शेख होते तर प्रमुख पाहुणे म्हणून



कल्याण परिमंडलातील मेळाव्यास मार्गदर्शन करताना मुख्य अभियंता श्री. चंद्रशेखर येरमे व इतर.

श्री. गुरुगोविंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालयचे विद्युत अभियांत्रिकी विभागातील प्रा. श्री.एम.के. पाटील उपस्थित होते.

या मेळाव्यास शहरातील श्री. गुरुगोविंद सिंग महाविद्यालयासह इतरही अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्युत अभियांत्रिकीची पदवी उत्तीर्ण झालेले शेकडो विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. या योजनेची सविस्तर माहिती सहाय्यक अभियंता श्री. नारायण चव्हाण यांनी दिली. यावेळी मुख्य अभियंता श्री. आर.जी.शेख, प्रा. श्री. एम.के.पाटील आणि अर्धापूर उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. एम.एस.औरादे यांची समयोचित भाषणे झाली.

**कल्याण परिमंडल :-** कल्याण – मंडल २ च्या वतीने नुकतेच बेरोजगार विद्युत अभियंत्यांसाठी कल्याण परिमंडलात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात बेरोजगार विद्युत अभियंत्यांना लॉटरी पद्धतीने कंत्राटी कामे देण्यासंबंधात मुख्य अभियंता श्री. चंद्रशेखर येरमे व अधीक्षक अभियंता श्री. नरेंद्र इंदूलकर यांनी मार्गदर्शन केले.

**भाडुंप परिमंडल (ठाणे मंडल):-** ठाणे नागरी मंडलाच्या वतीने मंडलस्तरीय बेरोजगार अभियंत्यांचा मेळावा उत्साहात पार पडला.



अभियंत्यांना मार्गदर्शन करताना ठाणे मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री.कैलास हुमणे व इतर.

मुख्य अभियंता श्री.सतिश करपे यांच्या निर्देशानुसार ठाणे मंडलाच्या सभागृहात पार पडलेल्या या मेळाव्यात सहभागी झालेल्या ४० ते ४५ अभियंत्यांना नोंदणी अर्जासह त्यांना देण्यात येणाऱ्या कामांचे स्वरूप अवगत करून देण्यात आले.

याप्रसंगी ठाणे मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री.कैलास हुमणे यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर बेरोजगार अभियंत्यांनी उपस्थित केलेल्या विविध शंकांचे समाधान त्यांनी केले. याप्रसंगी कार्यकारी अभियंते सर्वश्री.व्ही.एस. पाठक, मदन सांगळे, सुनिल देशपांडे, ए.जी. डोये व इतर अधिकारी उपस्थित होते.

## मानव संसाधन विभागाची आढावा बैठक



मानव संसाधन विभागाच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करतांना कार्यकारी संचालक (मा.सं.) श्री. नीलेश गटणे व उपस्थित इतर आधिकारी

मानव संसाधन विभागाच्या कामकाजाचा आढावा कार्यकारी संचालक (मा.सं.) श्री. नीलेश गटणे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत कार्यकारी संचालक श्री. गटणे यांनी सर्व सहाय्यक महाव्यवस्थापक आणि वरिष्ठ व्यवस्थापक यांना मार्गदर्शन केले व मानव संसाधन विभागातील कामांचा निपटारा जलद गतीने करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीस मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. संदेश हाके, मुख्य महाव्यवस्थापक (तां.आ.), श्री. मुरहरी केळे, मुख्य तपास अधिकारी श्री. सतीश पारटकर, महाव्यवस्थापक (मा.सं.व्य.प्र.) श्री. सुभाष कालेवाड, महाव्यवस्थापक (मा.सं) श्री. राजेंद्र पांडे, उपमहाव्यवस्थापक (तां.आ.) श्री. सतीश गडप्पा, उपमहाव्यवस्थापक (अ.तां.आ.) श्री. तुषार अर्जुनवाडकर, उपमहाव्यवस्थापक (मं.त.अ.का.) श्री. भुषण कुलकर्णी तसेच सर्व परिमंडलातील व सांघिक कार्यालातील सहाय्यक महाव्यवस्थापक आणि वरिष्ठ व्यवस्थापक उपस्थित होते.

## महावितरणच्या भारनियमनमुक्ती मॉडेलचे बिहारकडून कौतुक

महावितरणने राज्य भारनियमनमुक्तीसाठी राबविलेले मॉडेल उत्कृष्ट असल्याची प्रतिक्रिया बिहार राज्यातील होल्डींग व दक्षिण आणि उत्तर वितरण कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांनी व्यक्त केली. डी.सी.एल.व जी.एफ.एस.एस. योजनेच्या संदर्भात माहिती देण्यासाठी महावितरणच्या मुख्यालयातील भारव्यवस्थापन विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. प्रभाकर पेठकर तसेच कार्यकारी अभियंता श्री. ए.पी. मुदगलकर यांना कार्यशाळेत व्याख्यानासाठी निमंत्रित करण्यात आले होते. पाटणा येथे गेल्या महिन्यात झालेल्या कार्यशाळेत बिहार स्टेट पॉवर होल्डींग कंपनी, साऊथ बिहार पॉवर ड्रिस्टीब्यूशन कंपनी व नॉर्थ बिहार पॉवर ड्रिस्टीब्यूशन कंपनी या तिनही कंपन्यांचे वरिष्ठ संचालक, अधिकारी, अभियंते, कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेत महावितरणचे भारव्यवस्थापन, वितरण व वाणिज्यिक हानीवर आधारित भारनियमनाचे मॉडेल, फिडर सेप्रेशन, फिडरचे ऊर्जा अंकेक्षण इत्यादी बाबतची माहिती श्री. पी.जी. पेटकर व श्री. ए.पी. मुदगलकर यांनी दिली. या कार्यशाळेनंतर बिहार राज्यातील तिनही कंपन्यांचे व्यवस्थापकीय संचालक आणि संचालक यांनी महावितरणच्या विविध योजनांची माहिती घेतली तसेच या योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याबद्दल महावितरणचे कौतुक केले.

## बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी



चि. गौरव धनंजय चौधरी.
विभाग - मुंबई.
गुण - ८९.३८ टक्के.
पालक - श्री. धनंजय वासुदेव चौधरी, कनिष्ठ यंत्रचालक, २२ के.व्ही. स्विचिंग स्टेशन, उल्हासनगर उपविभाग ३,



कु. वैष्णावी विनोद गोरले,
विभाग - अमरावती.
गुण - ८५.५४ टक्के.
पालक - श्री. विनोद भिमराव गोरले, सहाय्यक यंत्रचालक, ३३/११ कि.व्हो. उपकेंद्र, आसेगाव शहर - १ उपविभाग,

### विना अपघात सेवा देणारे पुरस्कार प्राप्त वाहनचालक



अशोक अनंतराव गरड मुख्यालय, मुंबई.

## प्रशासकीय वृत्त

### बदली

| नाव | पद | सध्याचे कार्यालय | बदलीनंतरचे कार्यालय |
|---|---|---|---|
| डॉ.श्री. मुरहरी सोपनराव केळे | मुख्य अभियंता | तांत्रिक आस्थापना विभाग मुख्यालय मुंबई | वितरण विभाग मुख्यालय, मुंबई |
| श्रीमती. पुष्पा रामचरण चव्हाण | मुख्य महाव्यवस्थापक (तांत्रिक आस्थापना) | वितरण विभाग मुख्यालय, मुंबई | तांत्रिक आस्थापना विभाग मुख्यालय मुंबई |

### अधीक्षक अभियंतापदी पदोन्नती



श्री. भाऊसाहेब महादेव इरवे
राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण विभाग, मुख्यालय मुंबई.



श्री. मंगेश मनोहरराव कोहाट
नांदेड मंडल.



श्री. बंडू आनंदराव वासनिक
लातूर मंडल.

## ऋषीकेश गद्रे सी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण



ऋषीकेश चंद्रशेखर गद्रे हा मे २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या चाटर्ड अकाउंटच्या अंतिम परिक्षेत उत्तीर्ण झाला आहे. सध्या तो मास्टर इन बिझिनेस लॉ च्या परिक्षेची तयारी करीत आहे. प्रकाशगड मुख्यालयात महाव्यवस्थापक (लेखा व वित्त) या पदावर कार्यरत असलेले श्री. चंद्रशेखर गद्रे यांचा ऋषीकेश हा मुलगा आहे.

## महावितरणच्या मोबाईल ॲपचे ऊर्जामंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

वीज बिल भरण्यापासून ते कॉल सेंटरला तक्रार करण्यापर्यंतच्या महत्त्वपूर्ण सुविधा महावितरणने ग्राहकांसाठी मोबाईलवर उपलब्ध करुन दिल्या असून महावितरणच्या या मोबाईल ॲपचे उद्घाटन राज्याचे ऊर्जामंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. हे ॲप महावितरणच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने विकसित केले आहे.



ऊर्जामंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे मोबाईल ॲपचे उद्घाटन करताना सोबत ऊर्जासचिव श्री. मुकेशकुमार खुल्लर व व्यवस्थापकीय संचालक श्री. ओम प्रकाश गुप्ता.

या प्रसंगी ऊर्जा सचिव श्री. मुकेशकुमार खुल्लर, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक श्री. ओम प्रकाश गुप्ता व इतर संचालक उपस्थित होते.

ग्राहकांना अत्याधुनिक सुविधा देण्यासाठी महावितरणकडून सातत्याने नवनवीन उपाय योजना राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून महावितरणने मोबाईल ॲप तयार केले आहे. यात ग्राहकांना त्यांचे वीज बिल बघता तसेच भरता येईल. मोबाईल ॲपद्वारे क्रेडिट कार्ड किंवा नेटबँकिंगचा वापर करुन ग्राहक वीजबिल भरु शकतात.

याशिवाय या ॲपमध्ये ग्राहकांना वीज सेवेबाबत तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून तक्रार नोंदविण्यासाठी ग्राहकांना ग्राहक क्रमांकाची नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच या तक्रारीची पोच ग्राहकांना तक्रार क्रमांकासह एसएमएसद्वारे मिळणार आहे. या ॲपद्वारे महावितरणच्या १८००-२३३-३४३५ आणि १८००-२००-३४३५ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करता येईल. या ॲपमध्ये ग्राहकांना महावितरणशी संबंधित सेवांची चौकशी करता येईल व त्याबाबत सूचनाही करता येईल. विशेष म्हणजे ग्राहकाने आपल्या मोबाईल क्रमांकावरुन एकदा या ॲपवर नोंदणी केल्यास ग्राहकाला परत नव्याने नोंदणी करण्याची गरज राहणार नाही. ग्राहकांना महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेत स्थळावरुन तसेच Google Play Store वरुन हे ॲप डाऊनलोड करता येईल.

## आर-एपीडीआरपीच्या अंमलबजावणीला गती द्या
## व्यवस्थापकीय संचालक श्री. ओम प्रकाश गुप्ता

पुनर्रचित गतिमान विद्युत विकास व सुधारणा योजनेच्या (आर-एपीडीआरपी) अंमलबजावणीला गती देण्यात यावी व तयार यंत्रणा प्रत्यक्ष वापरासाठी संबंधीत विभागांनी सक्षमपणे काम करावे, असे निर्देश मा. व्यवस्थापकीय संचालक श्री. ओम प्रकाश गुप्ता यांनी दिले.



कामकाजाचा आढावा घेताना व्यवस्थापकीय संचालक श्री. ओम प्रकाश गुप्ता.

पुणे येथील प्रकाशभवन येथे आयोजित पुणे परिमंडलाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी पुणे परिमंडलाचे प्रभारी मुख्य अभियंता श्री. भालचंद्र खंडाईत, बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. रामाराव मुंडे, मुख्य अभियंता (गुणवत्ता नियंत्रण २) श्री. अरुण रणखांबे, विशेष कार्य अधिकारी श्री. श्रीकांत जलतारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत मा. श्री. गुप्ता यांनी विविध योजना, ग्राहकसेवा, वसुली व वितरण हानी आदींचा आढावा घेतला. यावेळी पुणे परिमंडलातील आर-एपीडीआरपीच्या अंमलबजावणीचे काम असमाधानकारक असल्याचे सांगितले. अद्यापही काही ग्राहकांना वीजबिले योग्य वेळेत दिली जात नाहीत. यापुढे सर्वच ग्राहकांना योग्य वेळेत बीजबिले मिळतील यासाठी उपाययोजना करावी. त्यासाठी बिले वाटप करणाऱ्या कंत्राटदारांची बैठक घ्यावी व गरज भासल्यास त्यांच्याविरुद्ध कारवाई करावी, असेही मा. श्री. गुप्ता यांनी सांगितले. सर्व उच्चदाब ग्राहकांच्या मीटरचे रिडींग हे १०० टक्के एएमआरच्या माध्यमातून झाले पाहिजे. फिडरनिहाय ऊर्जा अंकेक्षण (एनर्जी ऑडीट) करण्यात यावे. मोडेम इन्स्टॉलेशनच्या कामाची गती कमी असल्याने या कामाच्या प्रगतीची माहिती दरमहा मुख्यालयात पाठविण्याचे निर्देश त्यांनी दिले.

ग्रामपंचायतींच्या कार्यालयात ठेवलेल्या रजिस्टरमधील नोंदीनुसार ग्रामीण भागातील तक्रारी, समस्यांचे तातडीने निराकरण करण्यात यावे. बांधकामासाठी देण्यात येणारी तात्पुरती नवीन वीजजोडणी ही प्रीपेड मीटरच्या माध्यमातून देण्यात यावी आणि अभियंता, अधिकारी, कर्मचारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात निवासी राहावे, असे निर्देश मा. श्री. गुप्ता यांनी यावेळी दिले.

या बैठकीत महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. आलोक गांगुर्डे, उपसंचालक (दक्षता व सुरक्षा) कमांडर शिवाजी इंदलकर, अधीक्षक अभियंते सर्वश्री अंकुश नाळे, शिवाजी चाफेकरांडे, रमेश मलामे, प्रवीण काळे (प्रभारी), सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. धैर्यशील गायकवाड आदींसह कार्यकारी अभियंता, अधिकारी उपस्थित होते.

Printed & Published by Shri. Anil Mukundrao Kamble of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
Printed at **Jyotirling Enterprises**, 315 - B. Dean Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक: अनिल कांबळे
मुख्य जनसंपर्क अधिकारी (प्रभारी) (मासिक संवाद)
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)